StudySite.org

# A

CODE : **PRS**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 123085

प्रश्नपुस्तिका

वेळ : दीड तास

## चाळणी परीक्षा / SCREENING TEST

एकूण प्रश्न : 150
एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचें बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्त तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एका वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) -------------------------------------------------------------> (कृपया पान उलटवा)

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

StudySite.org

StudySite.org
StudySite.org



StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न.क्र. **201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र.क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे कंस पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

### पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे पृष्ठ उलटू नये

StudySite.org



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**1.** शब्द माध्यमाचा अतिवापर झाला तर __________ .

(1) व्यक्तिला थकवा येतो व संबंधित इंद्रियांची कार्यक्षमता कमी होते.

(2) व्यक्तित अभिरुची निर्माण होते व संबंधित इंद्रियांची कार्यक्षमता वाढते.

(3) व्यक्तिची आकलन क्षमता वाढते व कल्पना स्पष्ट होते.

(4) वरील सर्व.

---

**2.** नियम आणि तत्त्वांच्या पडताळ्यासाठी __________ उपागम उपयुक्त ठरतो.

(1) अवगामी (2) उद्‌गामी (3) संस्लेषणात्मक (4) विश्लेषणात्मक

---

**3.** प्रेषक व ग्राहक या दोघांची अनुभवक्षेत्रे ही भिन्न असतात. परंतु त्यापैकी जो भाग दोन्हीमध्ये सामाईक असतो तो म्हणजे संप्रेषण, असे मत __________ यांनी मांडले.

(1) शॅनन व व्हिव्हर (2) श्रॅम (3) मिलर (4) टेरीपेज व थॉमस

---

**4.** अंदाजाने चटकन केवळ निरीक्षणाने केंद्रिय प्रवृत्तीचे परिमाण हवे असते तेव्हा कशाचा उपयोग होतो?

(1) मध्यमानाचा (2) बहुलकाचा

(3) मध्यांकाचा (4) मध्यमान व मध्यांकाचा.

---

**5.** मध्यम आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दर्जा असणाऱ्या पालकांची माध्यमिक शाळेत शिकणारी मुले ही कनिष्ठ आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दर्जा असणाऱ्या पालकांच्या माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलांपेक्षा अधिक शैक्षणिक प्राविण्य मिळवितात.

वरील उदाहरण कोणत्या परिकल्पनेचे आहे?

(1) संशोधन परिकल्पना (2) शून्य परिकल्पना

(3) प्रश्न परिकल्पना (4) संशोधन परिकल्पना व शून्य परिकल्पना

---

**6.** व्यक्तीच्या जाणून घेण्याच्या प्रक्रियेला __________ म्हणता येईल.

(1) ज्ञान (2) आकलन (3) उपयोजन (4) कौशल्य

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



7. पथदर्शक अभ्यासाने संशोधकाला __________ .

(1) चूका, त्रुटी, उणिवा दूर करण्याची संधी मिळत नाही.

(2) उणिवा, चूका आणि त्रुटी दूर करण्याची संधी मिळते.

(3) विचार करण्याची संधी मिळते.

(4) वरील सर्व.

---

8. जेव्हा दोन व्यक्ती आपापसात आपल्या विचारांची, भावनांची, कल्पनांची व अनुभवांची देवाण-घेवाण करतात तेव्हा त्या संप्रेषणाला __________ म्हणता येईल.

(1) व्यक्ती-समूह यांच्यातील संप्रेषण. (2) व्यक्ती-अंतर्गत संप्रेषण

(3) समूहांतर्गत संप्रेषण (4) वरील सर्व

---

9. भारत सरकारने __________ मध्ये केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळाची स्थापना केली.

(1) 1920 (2) 1919 (3) 1921 (4) 1924

---

10. एन.सी.टी.ई. (N.C.T.E.) चे प्रमुख उद्दिष्ट कोणते ?

(1) प्रशिक्षण संस्थांना मान्यता देणे

(2) अभ्यासक्रमात व पद्धतीबाबत मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे

(3) शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेचा विकास करणे

(4) नवीन मूल्यमापन तंत्रे विकसित करणे.

---

11. वर्ग संप्रेषण प्रक्रियेत चांगला शिक्षक नेहमी संदेशाची निवड व मांडणी करताना __________ गोष्टींना प्राधान्य देतो.

(1) विद्यार्थी गट, त्यांची क्षमता, गरज, स्वरूप व सांस्कृतिक पार्श्वभूमी इत्यादी

(2) विद्यार्थी कुवत, आकलन क्षमता, अभिरुची व सांस्कृतिक विकास इत्यादी

(3) विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता, भावनिक विकास, अभिरुची व सवय इत्यादी

(4) विद्यार्थ्यांची सवय, मानसिकता व परिपक्वता इत्यादी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**12.** एन.सी.टी.ई. (N.C.T.E.) ची चार प्रादेशिक कार्यालये __________ येथे आहेत.

(1) भोपाल, म्हैसूर, भुवनेश्वर आणि अजमेर (2) बंगलोर, भोपाल, भुवनेश्वर आणि जयपूर

(3) भुवनेश्वर, जयपूर, भोपाल आणि अजमेर (4) म्हैसूर, अजमेर, जयपूर आणि बंगलोर

---

**13.** सर्व गुणांकाच्या बेरजेला एकूण संख्येने भागले असता येणाऱ्या संख्येला त्या वितरणाचे __________ असे म्हणतात.

(1) मध्यमान (2) विचलनशीलता (3) प्रमाण विचलन (4) शततमक

---

**14.** राजेश बोर्डाच्या परीक्षेत अपयशी झाला, शिक्षकांनी पेपर कडक तपासले, असे म्हणतो. हे कशाचे उदाहरण आहे?

(1) विस्थापन (2) उदात्तीकरण (3) दमन (4) प्रक्षेपण

---

**15.** अहवाल लेखनाची भाषा __________ .

(1) विचार सहजपणे स्पष्ट करणारी असावी. (2) अलंकारिक असावी.

(3) संभाषणात्मक असावी. (4) सहज आकलन होईल अशी असावी.

---

**16.** एका संशोधकाने दोन सारखे वाटणारे गट घेतले. एका गटास प्रायोगिक पद्धतीने शिकविले. नंतर उत्तर चाचणी दिली. दुसऱ्या गटास पारंपारिक पद्धतीने शिकविले. नंतर उत्तर चाचणी दिली. तर संशोधकाने कोणता प्रायोगिक अभिकल्प वापरला?

(1) यादृच्छिक निवड-दोन गट-उत्तर चाचणी अभिकल्प

(2) दोन गट-यादृच्छिक जोडी निवड अभिकल्प

(3) दोन गट-यादृच्छिक निवड-पूर्व व उत्तर चाचणी अभिकल्प

(4) दोन गृहीत समान गट-फक्त उत्तर चाचणी अभिकल्प.

---

**17.** संशोधन समस्येचे तात्पुरते किंवा संभाव्य उत्तर म्हणजे __________ .

(1) तथ्यांचे विश्लेषण (2) संशोधन निष्कर्ष (3) गृहीतके (4) सिद्धांत

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



18. शत्रुसंधो (SWOT) म्हणजे ________ .
 (1) शक्तीस्थाने, त्रुटी, संस्था, धोके
 (2) शासन, त्रुटी, संस्था, धोरण
 (3) शक्तीस्थाने, त्रुटी, संधी, धोके
 (4) शक्तीमान, त्रुटक, संयोजन, धोरण

19. संशोधनात संशोधक ज्या विधानांवर विश्वास ठेवतो परंतु त्यांची पडताळणी करु शकत नाही अशा विधानांना ________ म्हणतात.
 (1) गृहितके
 (2) परिकल्पना
 (3) उद्दिष्टे
 (4) संशोधन चले.

20. चलांमध्ये कार्यकारण संबंध प्रस्थापित करण्यास ________ संशोधन पद्धती सर्वात सक्षम ठरते.
 (1) ऐतिहासिक
 (2) प्रायोगिक
 (3) वर्णनात्मक
 (4) सहसंबंध

21. आपली असमर्थता ही आपली कमतरता नसून ती दुसऱ्याची चूक आहे असे सांगण्याची प्रवृत्ती म्हणजे ________ .
 (1) दमन
 (2) विस्थापन
 (3) प्रक्षेपण
 (4) तादात्म्य

22. "प्राविण्याचे संदर्भात मुले ही मुलींपेक्षा श्रेष्ठ नाहीत", ही ________ प्रकारची परिकल्पना आहे.
 (1) अ-दिशादर्शक
 (2) द्वि-पृच्छीय
 (3) दिशादर्शक
 (4) शून्य

23. संकल्पना प्राप्ति प्रतिमान ________ यांनी मांडले.
 (1) ब्रुनर
 (2) आसूबेल
 (3) स्किनर
 (4) थार्नडाईक

24. कसोटीच्या प्रश्नातील उत्तराचे गुणांवर परीक्षकांच्या मतांचा प्रभाव न पडणे, म्हणजे ________ होय.
 (1) वस्तुनिष्ठता
 (2) व्यवहार्यता
 (3) सप्रमाणता
 (4) विश्वसनीयता

25. जेव्हा एखाद्या विशिष्ट भौगोलिक प्रदेशातून काही भाग एकक म्हणून निवडावयाचे असतील तेव्हा ________ ही पद्धती वापरतात.
 (1) लॉटरी
 (2) ग्रीड
 (3) सारणी
 (4) यादृच्छिक संख्यापत्रके.

कच्च्या कामासाठी जागा

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**26.** संप्रेषण प्रक्रियेतील मूलभूत घटक कोणते ?

(1) प्रेषक-संदेश-माध्यम-ग्राहक
(2) प्रेषक-संदेश-प्रक्रिया-माध्यम
(3) संदेश-प्रेषक-विचार-प्रक्रिया
(4) संदेश-प्रेषक-वैशिष्टे-माध्यम.

---

**खालील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 27 ते 31 प्रश्नांची उत्तरे द्या.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अन्न व शक्तीची उपमा दिली आहे. त्यांच्या मते, ''ज्याप्रमाणे मनुष्य प्राण्याला अन्नाची जरुरी आहे त्याच प्रमाणे सर्वांना विद्येची जरुरी आहे.'' अन्नाशिवाय व्यक्तीला जगणे कठीण आहे. अन्न सेवनाने व्यक्तीला शक्ती प्राप्त होऊन त्याप्रमाणे ती व्यक्ती अधिक जोमाने कार्यक्षम राहू शकते. अन्नाप्रमाणे शिक्षणाला महत्व आहे. त्यांच्या मते, 'शिक्षण हे व्यक्तींच्या शरीरात भिनले पाहिजे. त्यामुळे त्याचे मन आणि शरीर सुदृढ राहील. शिक्षणाअभावी व्यक्ती पशुवत होईल. म्हणून व्यक्तीला शिक्षणाची आयुष्यभर गरज असते. जिवंत असे पर्यंत तो अन्नाची तसेच आयुष्यभर शिक्षणाची गरज असल्याने शिक्षण आयुष्यभर चालणारी एक प्रक्रिया आहे. आयुष्याचा शेवट झाल्यास शिक्षणाचाही शेवट होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:च्या अध्ययनाने त्यांच्या नावासमोर एम.ए., पी.एच.डी., डी.एस.सी.एल.एल.डी. डीलीट, बॉर अॅट-ला या पदव्यांच्या मालीकांनी सिद्ध करुन दाखविले आहे. त्यांचा वाचनाचा व्यासंग व स्मरणशक्ती इतकी दांडगी होती की कोणते वाक्य कोणत्या पुस्तकात कोठे आहे, हे ते सत्वर सांगत असत. पुस्तक वाचन हे त्यांच्यासाठी शक्तीवर्धक साधनच होते. त्यामुळे त्यांची बुद्धी तल्लख झाली होती.

StudySite.org

---

**27.** शिक्षणाला कशाची उपमा दिली आहे ?

(1) शक्तीची (2) दुधाची (3) अन्नाची (4) अन्न व शक्तीची

---

**28.** शिक्षण __________ चालणारी प्रक्रिया आहे.

(1) आयुष्यभर (2) सतत (3) खडतर (4) निरंतर

---

कच्च्या कामासाठी जागा



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



29. वरील परिच्छेदास कोणते शीर्षक सुचवाल ?

(1) शिक्षण (2) शिक्षण एक अन्न व शक्ती
(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (4) पदव्यांचा पाऊस.

---

30. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोणते वाक्य कोणत्या पुस्तकात कोठे आहे, हे सत्वर का सांगत ?

(1) अभ्यासामुळे (2) पाठांतरामुळे (3) सतत वाचनामुळे (4) स्मरणशक्तीमुळे

---

31. बाबासाहेबांच्या मते कशाच्या अभावाने व्यक्ती पशुवत होईल ?

(1) मूल्या अभावी (2) शिक्षणाअभावी (3) अभ्यासाअभावी (4) अन्ना अभावी.

---

32. __________ यांनी वर्गातील आंतरक्रिया विश्लेषण तंत्राचा विकास केला.

(1) थार्नडाईक (2) डेव्हीस (3) रॉबर्ट ग्लॅसर (4) फ्लॅंडर्स

---

33. इंटरनेटवरील माहिती शोधण्यासाठीच्या सुविधेला __________ असे नांव आहे.

(1) सर्च इंजिन (2) डिक्शनरी (3) डिरेक्टरी (4) वेब डिरेक्टरी

---

34. जेव्हा प्रसामान्य वितरण आलेखीय प्रतिरुपणात दाखवतात तेव्हा तो __________

(1) बहुभुजाकृती आलेख असतो. (2) संभव वक्र आलेख असतो.
(3) ऋण विषमित वक्र आलेख असतो. (4) धन विषमित वक्र आलेख असतो.

---

35. एका सांकेतिक भाषेत HCTAW म्हणजे WATCH हा शब्द होय तर त्या सांकेतिक भाषेत ESUOH म्हणजे काय ?

(1) HORDE (2) HOUSE (3) HORSE (4) HOUND

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



36. श्रेणी, मुलाखती व दैनंदिनी हे आधारसामग्रीचे ________ स्रोत होत.

(1) अंकात्मक (2) संख्यात्मक (3) गुणात्मक (4) मूल्यात्मक

37. संख्यात्मक आधारसामग्रीत ________

(1) संशोधनातील विविध परिकल्पनांविषयी माहिती असते

(2) संशोधनातील विविध चलांसंबंधी माहिती असते

(3) संशोधनातील विविध उद्दिष्टांसंबंधी माहिती असते

(4) संशोधनातील विविध आधारसामग्रीविषयी माहिती असते.

38. ऑनलाईन परिषदा ________ आधारे चालविल्या जातात.

(1) भ्रमणध्वनीच्या (2) टेलिफोनच्या (3) आंतरजालाच्या (4) ई-मेलच्या

39. त्वचेच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले कारण

(1) अतिनील किरणांमुळे (2) ओझोनचा थर विरळ झाल्यामुळे

(3) हरितगृहाच्या परिणामामुळे (4) वरील पैकी सर्व.

40. विशिष्ट पाठ्यक्रमाची उद्दिष्टे एखाद्या विद्यार्थ्यांनी कितपत यशस्वीपणे साध्य केली हे पाहण्यासाठी कोणत्या कसोटीचा वापर करतात ?

(1) व्यक्तिमत्व कसोटी (2) संपादन कसोटी

(3) अभिवृत्ती मापन कसोटी (4) सर्जनशीलता कसोटी

41. 'कठपुतळ्या' हे ________ शैक्षणिक साधन आहे.

(1) अप्रक्षेपित (2) प्रक्षेपित (3) श्राव्य (4) दृकश्राव्य


**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org






**प्रश्न क्रमांक 42 ते 46 या प्रश्नांची उत्तरे वरील आलेखाच्या आधारे लिहावीत.**

आलेखात आठवड्यातील विक्रीचा चढ-उतार दर्शविला आहे त्याचे नीट निरीक्षण करा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

**42.** आठवड्यातील सरासरी दैनिक विक्री किती असावी ?

(1) सुमारे 325 रूपये (2) सुमारे 428 रूपये (3) सुमारे 027 रूपये (4) सुमारे 375 रूपये

---

**43.** कोणत्या दोन दिवसाच्या विक्रीतील तफावत मोठ्या प्रमाणात होती ?

(1) रवि-सोम (2) मंगळ-बुध

(3) गुरु-शुक्र (4) यापैकी कोणतेही नाही

---

**44.** आठवड्यातील कोणत्या दिवशी जास्तीत जास्त विक्री झाली ?

(1) सोमवार (2) बुधवार (3) गुरुवार (4) शनिवार

---

**45.** रविवार व सोमवार तसेच मंगळवार व बुधवारच्या दरम्यानची उलाढाल (पैशातील) कशी होती ?

(1) समान (2) असमान (3) जास्त (4) कमी.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



46. सर्वात कमी विक्री होणारा दिवस कोणता?

(1) शनिवार (2) रविवार

(3) बुधवार व गुरुवार (4) यापैकी कोणताही नाही

47. माहिती तंत्रज्ञानाने __________ .

(1) व्यवस्थापकीय कौशल्य विकसित करता येतात.

(2) निरीक्षण क्षमता विकसित करता येते

(3) नेतृत्व क्षमता विकसित करता येते

(4) निर्णयक्षमता विकसित करता येते.

48. स्थूलमानाने सहसंबंध गुणक 0.40 ते 0.59 आला त्या सहसंबंध गुणकाचा अर्थ __________ असा होईल.

(1) सहसंबंध आहे, पण अगदी अल्प (2) लक्षात घेण्याइतका चांगला सहसंबंध.

(3) सहसंबंध दुर्लक्षिण्याजोगा (4) चांगला सहसंबंध.

StudySite.org

49. विद्यापीठ शिक्षण आयोगाला (1948) __________ या नावाने ओळखले जाते.

(1) कोठारी आयोग (2) मुदलियार आयोग

(3) राधाकृष्णन आयोग (4) कलकत्ता विद्यापीठ आयोग

50. संजयचे एका परीक्षेतील सहा विषयांचे गुण पुढीलप्रमाणे आहेत, तर त्याच्या गुणाचे मध्यमान किती?

| मराठी | हिन्दी | इंग्रजी | समाजशास्त्र | विज्ञान | गणित |
|---|---|---|---|---|---|
| 68 | 66 | 30 | 68 | 72 | 86 |

(1) 66 (2) 60 (3) 65 (4) 68

कच्च्या कामासाठी जागा



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**51.** .com हे Extention __________ फाईल्स करीता वापरले जाते.

(1) डाक्युमेंट फाईल्स (2) सिस्टिम फाईल्स (3) हेल्प फाईल्स (4) टेक्स्ट फाईल्स

---

**पुढील उतारा वाचून प्रश्न 52 ते 56 ची उत्तरे द्या :**

ज्ञान आणि विद्या शाळेच्या चार भिंतीच्या आतच मिळते असे नाही. सबंध जग ही माणसाची शाळा आहे. अन् आयुष्याच्या अखेरच्या घटकेपर्यंत माणसाचे शिक्षण चालू असते. शाळेत तुमचे शिक्षक जी विद्या तुम्हाला देतात ती तर मोलाची आहेच, पण त्या विद्येव्यतिरिक्त शिकवण्यासारख्या कितीतरी गोष्टी आहेत. त्या शिकण्यासाठी कोणी शाळा काढल्या नाहीत. परंतु त्या शिकल्याशिवाय मनुष्याच्या जीवनात आनंद निर्माण होत नाही व त्याच्या अंगी खरा शहाणपणा येत नाही. रस्त्यावर, क्रिडांगणावर, बसस्थानकावर, देवळात, दुकानात, सभेत, बाजारात तुम्ही जाल त्या ठिकाणी शिकवण्यासारख्या गोष्टी आढळतील. मात्र त्या शोधण्यासाठी दृष्टी तुम्हाला असली पाहिजे. आणि तुमच्या अंगी हौस असली पाहिजे. अवलोकन शक्ती व आवड या दोन गुणांचे संवर्धन तुम्ही शक्य तितके केले पाहिजे. टीपकागद ज्या प्रमाणे शाईचा थेंब टिपून घेतो, त्याप्रमाणे शिकण्यासारख्या गोष्टी तुम्ही शोधक नजरेने टिपून घेतल्या पाहिजे. जे जे सुंदर, उपयुक्त, अनुकरणीय दिसेल ते ते आत्मसात करण्याचा तुमचा प्रयत्न असला पाहिजे यासाठी विविध विषयांची जिज्ञासा, लालसा, आवड तुम्ही तुमच्या अंगी वाढविली पाहिजे. जो विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानातच प्रवीण आहे, त्याच्यापेक्षा जो अभ्यासात प्रवीण असून ही इतर विद्यांची ज्याने ओळख करुन घेतली आहे, त्याची खरी कौतुकानं पाठ थोपटली पाहिजे.

StudySite.org

---

**52.** मुलांना विद्या कोणाकडून मिळते ?

(1) व्यापाऱ्यांकडून (2) श्रीमंतांकडून (3) गरीबांकडून (4) शिक्षकांकडून

---

**53.** ज्ञान आणि विद्या कोठे मिळते ?

(1) कारखान्यात (2) सभागृहात (3) जगामध्ये (4) यापेक्षा वेगळे उत्तर

---

**54.** विद्यार्थी कोणत्या ज्ञानात पारंगत असतो ?

(1) पुस्तकी (2) जागतिक (3) समाजातील (4) लोकांमधील

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



55. माणसाचे शिक्षण कोठपर्यंत चालते ?

(1) तरुणपणापर्यंत (2) म्हातारपणापर्यंत

(3) मध्यमवयापर्यंत (4) शेवटच्या घटकेपर्यंत

---

56. विद्यार्थ्यांनी ज्ञान कसे मिळविले पाहिजे ?

(1) अनुकरणीय दिसेल ते आत्मसात केले पाहिजे. (2) लिहून

(3) वाचून (4) मनन करून.

---

57. सतत दोन दशके आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट खेळण्याचा विक्रम कोणत्या भारतीय खेळाडूच्या नावावर नुकताच नोंदविला गेला ?

(1) के. श्रीकांत (2) सचिन तेंडूलकर

(3) जे. श्रीनाथ (4) सुनिल गावस्कर

---

58. एकच कसोटी निरनिराळ्या प्रसंगी, निरनिराळ्या गटांना दिली असता प्राप्तांकामध्ये लक्षणीय फरक पडत नसेल, तर ती कसोटी __________ समजली जाते.

(1) विश्वसनीय (2) सप्रमाण (3) प्रमाणीत (4) समवर्ती सप्रमाण.

---

59. जेव्हा विसंकेतीकरण नीट होत नाही तेव्हा __________ .

(1) संदेशग्रहण अचूकपणे होत नाही. (2) संदेशग्रहण अचूकपणे होते.

(3) संदेशग्रहणात चित्र उभे राहते. (4) संदेशग्रहणात वास्तवता असते.

---

60. ऑगस्ट 2009 पर्यंत महाराष्ट्र राज्यात महिलांसाठी __________ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) स्थापन करण्यात आल्या होत्या.

(1) 20 (2) 22 (3) 18 (4) 15

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



61. हरलॉकच्या मते पौगंडावस्थेत होणाऱ्या बदलांचे अभिवृत्ति व वर्तनावरील परिणाम शारीरिक बदलापेक्षाही ________ बदलांमुळे जास्त होतात.

(1) मानसिक (2) सामाजिक (3) आर्थिक (4) शैक्षणिक

62. पुढीलपैकी कोणती किंमत सुसंगत नाही?

(1) $\frac{25}{104}$ (2) $\frac{35}{91}$ (3) $\frac{45}{117}$ (4) $\frac{55}{143}$

63. वर्गातील संप्रेषण प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी शिक्षक कोणत्या संप्रेषण मार्गाचा अवलंब करतील.

(1) बोलणे-ऐकणे (2) सांगणे-श्रवण करणे (3) दाखविणे-पहाणे (4) दाखविणे-बोलणे

64. महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्नाचे क्षेत्रनिहाय विभाजन केले असता कोणते विधान सत्य आहे?

(1) कृषीक्षेत्राचा वाटा घटला व सेवा क्षेत्राचा वाटा वाढला.

(2) उद्योगक्षेत्राचा वाटा घटला व कृषी क्षेत्राचा वाटा वाढला.

(3) सेवा क्षेत्राचा वाटा घटला व उद्योग क्षेत्राचा वाटा वाढला.

(4) सेवा क्षेत्राचा वाटा किंचित वाढला व उद्योग क्षेत्राचा वाटा सर्वाधिक वाढला.

StudySite.org

65. 18 वर्षाखालील मुलीचे लग्न करणे कायद्याने गुन्हा असूनही अल्पवयीन विवाह होत असल्याने सुमारे 4 लाख अल्पवयीन माता असल्याचे, अनेक मुली 14 व्या वर्षीच आई बनत असल्याचे व त्यामुळे गरोदरपणातच मृत्यु होत असल्याचे ________ च्या सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे.

(1) नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वे (राष्ट्रीय कुटुंब व आरोग्य सर्वेक्षण)

(2) नॅशनल कमिशन फॉर वुमेन (राष्ट्रीय महिला आयोग)

(3) नॅशनल सँपल सर्व्हे (राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण)

(4) ह्युमन डेव्हलपमेंट मिनिस्टरी (मानव संसाधन मंत्रालय)

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



66. खालील क्रमवारीत प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय कोणता येईल ?

AZC FUH KPM PKR ?

(1) UFW (2) WFK (3) UKP (4) DGO

---

67. ________ च्या मिश्रणाने उत्तम दर्जाची प्रथिने प्राप्त होतात.

(1) तृणधान्ये व भाज्या (2) फळे व भाज्या

(3) तृणधान्ये व कडधान्ये (4) तूप व कडधान्ये

---

68. सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने ________ या नावाने वृद्धाश्रम सुरु केले.

(1) अण्णा हजारे वृद्धाश्रम (2) विनोबा भावे वृद्धाश्रम

(3) महात्मा गांधी वृद्धाश्रम (4) मातोश्री वृद्धाश्रम

---

StudySite.org

69. 'स्लमडॉग मिलिनियर' या चित्रपटाला ________ ऑस्कर पुरस्कार प्राप्त झाले.

(1) आठ (2) एक (3) दहा (4) दोन

---

70. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर येईल ?

| | | |
|---|---|---|
| D | I | ? |
| G | L | Q |

(1) Y (2) H (3) N (4) B

---

71. मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत इयत्ता पाचवीला इंग्रजी विषय शिकविताना शिक्षकांना येणाऱ्या समस्या व त्यावर उपाय हा संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी संशोधक खालीलपैकी नमुना निवड पद्धतीचा उपयोग करेल.

(1) प्रासंगिक किंवा सहजप्राप्त नमुना निवड पद्धती (2) हिश्शेखानी पद्धती, निर्दिष्टांश नमुना निवड पद्धती.

(3) सहेतुक नमुना निवड पद्धती (4) गुच्छा नमुना निवड पद्धती.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



72. अंतर्गत मूल्यांकनामध्ये __________ .

(1) वर्षाअखेरीस विद्यार्थ्यांची जी परीक्षा घेतली जाते त्याचे मूल्यन केले जाते.

(2) वर्षभर विद्यार्थी जे सतत कार्य करत असतो त्याचे मूल्यन केले जाते.

(3) वर्षभर विद्यार्थी जी लेखी परीक्षा देतो त्याचे मूल्यन केले जाते.

(4) वर्षभर विद्यार्थ्याचे जे प्रात्यक्षिक कार्य असेल त्याचे मूल्यन केले जाते.

---

73. पियाजेच्या बौद्धिक विकासाच्या अवस्थांचे संशोधन, स्किनरची साधक अभिसंधान उपपत्ती ही __________ संशोधनाची उदाहरणे आहेत.

(1) मूलभूत (2) उपयोजित (3) कृती (4) ऐतिहासिक

---

74. स्कर्व्ही टाळण्यासाठी आहारात __________ जीवनसत्त्व योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे.

(1) जीवनसत्त्व 'ड' (2) जीवनसत्त्व 'ब' संयुक्त

(3) जीवनसत्त्व 'अ' (4) जीवनसत्त्व 'क'

---

75. महिलांना नोकरीत (शासकीय व निमशासकीय) __________ आरक्षण देण्यात आलेले आहे.

(1) 27% (2) 30% (3) 33% (4) 28%

---

76. पूर्वबाल्यावस्थेतील सामाजिकरण प्रक्रियेत मुले __________ यांचे धडे घेऊ लागतात.

(1) सर्वसमावेशकता व परिपक्वता (2) लोकशाही नेतृत्व व प्रेरणा

(3) स्वावलंबन व सद्वर्तणूक (4) सुदृढ व्यक्तिमत्व व लोकप्रियता

---

77. 2010 हे वर्ष भारतीय रिझर्व्ह बँक __________ म्हणून साजरे करीत आहे.

(1) रौप्य महोत्सवी वर्ष (2) सुवर्ण महोत्सवी वर्ष

(3) हिरक महोत्सवी वर्ष (4) शतकपूर्ती वर्ष

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**78.** जन्मानंतर बालकाला लवकरात लवकर (1 तासाच्या आत) __________ दूध दिले पाहिजे.

(1) गाईचे (2) पावडरचे (3) मधाचे (4) मातेचे

**79.** दूध या अन्नघटकामध्ये __________ या पोषक तत्त्वाचे प्रमाण अत्यल्प असते.

(1) कॅलशियम (2) लोह (3) प्रथिन (4) उष्मांक

**80.** __________ या पोषक घटकाच्या अभावाने बालकांमध्ये झुरणी हा रोग होतो.

(1) कॅलशियम (2) लोह (3) प्रथिने (4) स्निग्ध पदार्थ

**81.** 17 नोव्हेंबर 2008 रोजी भारताला भेट देणारे इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष __________ यांना 'जवाहरलाल नेहरु पुरस्कार' देवून सन्मानित करण्यात आले.

(1) बराक ओबामा (2) होश्नी मुबारक (3) अल उमर शेख (4) खात्मी मुबारकशाह

StudySite.org

**82.** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (NCERT) __________ हे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

(1) मानवी संसाधन खात्याचे मंत्री (2) राज्याचे उच्च शिक्षण मंत्री

(3) विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष (4) संस्थेचे सचिव.

**83.** "शिक्षण साहित्य व पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी एक स्वतंत्र संस्था असावी" अशी शिफारस कोणी केली होती ?

(1) मुदलियार शिक्षण आयोग (2) डॉ. राधाकृष्णन आयोग

(3) डॉ. कोठारी शिक्षण आयोग (4) हंटर आयोग

**84.** __________ या द्विदल धान्यात प्रथिनांचे प्रमाण जास्त असते.

(1) उडिद (2) मूग (3) सोयाबीन (4) तूर

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



85. माझ्याकडे फुलांचे तीन गुच्छ असून त्यात गुलाब, लिली, शेवंती व जरबेरा अशी फुले आहेत. दुसऱ्या गुच्छात जितके फुलांचे प्रकार आहेत तितकेच प्रकार पहिल्या गुच्छातही आहेत. दुसऱ्या गुच्छात असलेला एक प्रकार पहिल्या गुच्छात नाही. तिसऱ्या गुच्छात एकाच प्रकारची फुले आहेत व त्याप्रकारची फुले पहिल्या दोन्ही गुच्छांत नाहीत. कोणते दोन गुच्छ एकत्र केले तर त्यात सर्वप्रकारची फुले असतील ?

(1) पहिला व दुसरा (2) असे होणे शक्य नाही (3) दुसरा व तिसरा (4) पहिला व तिसरा.

---

86. एका सांकेतिक लिपीत 'BHARAT' हा शब्द DJCSCV असा लिहिला आहे. तर याच लिपीत 'INDIA' हा शब्द कसा लिहिता येईल ?

(1) PKCKF (2) KCPKF (3) KFPKC (4) KPFKC

---

87. समाज कार्यकर्ता जेव्हा योजनाकार म्हणून भूमिका करतो तेव्हा तो __________ संवेदनशील असतो.

(1) भूमिकांमधील पेचप्रसंगाबद्दल

(2) सेवार्थीला मदत करण्याबद्दल

(3) समुदाय व समाजाच्या गरजा व परिस्थितीबद्दल

(4) समाज-साधनसामुग्री व परिस्थितीबद्दल.

---

StudySite.org

88. पुणे येथील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालय (सीएमई) कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे ?

(1) पुणे विद्यापीठ, पुणे.

(2) मुंबई विद्यापीठ, मुंबई

(3) जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली.

(4) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

---

89. एका गावातील एकूण 1600 मतदारांपैकी 800 पुरुष आणि 600 स्त्रियांनी मतदान केले. त्यात 80% पुरुषांची आणि 90% स्त्रियांची मते वैध ठरली. तर एकूण मतदानाच्या किती टक्के मते अवैध ठरली ?

(1) 13.75% (2) 15.71% (3) 27.5% (4) 36.67%

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**90.** भारताच्या निवडणूक आयोगाने जानेवारी 2010 मध्ये आपला ________ महोत्सव साजरा केला.

(1) सुवर्ण (2) रौप्य (3) हिरक (4) शतक

---

**91.** विकासाच्या तत्त्वानुसार अक्षानुवर्ती विकास हा ________ कडे होतो.

(1) डोक्याकडून पायाकडे (2) शरीरमध्याकडून बाजूकडे

(3) पायाकडून डोक्याकडे (4) बाजूकडून शरीरमध्याकडे

---

**92.** क्षेत्रिक शिक्षण संस्था (R.I.E.) खालील ठिकाणी आहेत.

(1) अजमेर, जयपूर, भुवनेश्वर व म्हैसूर (2) भोपाल, बंगलोर, म्हैसूर व अजमेर

(3) अजमेर, भोपाल, भुवनेश्वर व म्हैसूर (4) भुवनेश्वर, अजमेर, भोपाल व जयपूर

---

**93.** नॉर्मन बोरलॉग यांना जग काय म्हणून ओळखते ?

(1) हरित क्रांतीचे जनक (2) संगणक क्रांतीचे जनक

(3) श्वेतक्रांतीचे जनक (4) माहिती तंत्रज्ञानाचे जनक

---

**94.** माहिती तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांच्या ________ घटकावर परिणाम करते.

(1) विषयज्ञान (2) वर्तन (3) अध्ययन अनुभव (4) कौशल्य

---

**95.** एका शहरातील संगणकांचे परस्परांशी जोडलेले जाळे म्हणजेच ________ .

(1) लोकल एरिया नेटवर्क (2) वाईड एरिया नेटवर्क

(3) मेट्रोपॉलिटन एरिया नेटवर्क (4) वरील सर्व

---

**96.** संत तुकाराम यांच्या अभंगांचे 'सेज तुका' या नावाने भाषांतर कोणत्या साहित्यिकाने केले ?

(1) अरुण कोलटकर (2) दिलीप चित्रे (3) बा. भ. बोरकर (4) प्रकाश संत

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**97.** संप्रेषण कौशल्यामुळे __________ .

(1) सामाजिक वातावरणात गोंधळ निर्माण होतो
(2) सामाजिक वातावरण एकमार्गी होते.
(3) सामाजिक वातावरण निरोगी ठेवता येते.
(4) सामाजिक वातावरणात द्विमार्ग निर्माण होतात.

---

**98.** एका रांगेत जोना नेमकी मधल्या क्रमांकावर उभी आहे. तिच्या डाव्या बाजूला सात क्रमांक सोडून उभी असलेली जया त्या रांगेच्या डाव्या बाजूला पहिल्या क्रमांकावर असलेल्या सबिना व जोना यांच्या दरम्यानच्या नेमकी मधल्या क्रमांकावर उभी आहे. तर त्या रांगेतील एकूण मुले किती ?

(1) 33 (2) 34 (3) 30 (4) 31

---

**99.** नवजात अवस्था म्हणजे जन्म ते __________ दिवस होय.

(1) 15 (2) 25 (3) 28 (4) 30

---

**100.** संसदेत व विधिमंडळात महिलांसाठी आरक्षणाची तरतूद असणारे व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या दिवंगत खासदार कॉ. गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त सांसदीय समितीने 1996 साली अहवालाद्वारे शिफारस केलेले विधेयक राज्यसभेत कधी मंजूर झाले ?

(1) 8 मार्च 1996 (2) 8 मार्च 2010 (3) 9 मार्च 2010 (4) मंजूर झालेच नाही.

---

**101.** परवा सोमवार होता. आज हवामान ढगाळ आहे. काल जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. ही तिन्ही विधाने सत्य असतील तर पुढीलपैकी कोणते विधान निश्चित बरोबर ठरेल ?

(1) उद्या पाऊस पडेल
(2) रविवारी पाऊस पडला नाही
(3) मंगळवारी पाऊस पडला.
(4) सोमवारी हवा स्वच्छ होती.

---

**102.** गडचिरोली जिल्ह्यातील 'सर्च' (सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन ॲण्ड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ) या संस्थेचे संस्थापक कोण आहेत ?

(1) डॉ. प्रकाश आमटे
(2) डॉ. हिम्मतराव बाविस्कर
(3) डॉ. अभय बंग
(4) डॉ. विकास महात्मे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**103.** खालील शब्दांचे निरीक्षण करून प्रश्नचिन्हाच्या जागी अचूक पर्याय निवडा.

तिरूअनंतपूरम रूअनंतपूरम रूअनंतपूर अनंतपूर अनंतपू ?

(1) नंत (2) नंतपू (3) पूतनं (4) अनंत

---

**104.** 'ग्रामन्यायालय कायदा' केव्हापासून लागू झाला ?

(1) 2 आक्टोबर 2008 (2) 30 जानेवारी 2009

(3) 2 आक्टोबर 2009 (4) 14 नोव्हेंबर 2008

---

**105.** भारतीय दंडसंहितेच्या कलम __________ नुसार कौटुंबिक हिंसाचार हा एक गंभीर गुन्हा समजला जातो.

(1) 498 (B) (2) 310 (3) 420 (4) 315

---

**106.** नवजात बालकाच्या पायाच्या तळव्याला स्पर्श केल्यास तो पायाची बोटे पसरवितो. या प्रतिक्षेपक क्रियेला __________ प्रतिक्षेपक क्रिया म्हणतात.

(1) बॅविनस्की (2) मोरो (3) टोनिक नेक (4) डॉर्विनियन

---

**107.** आय.पी.सी.सी. म्हणजे __________ .

(1) इंडियन प्रिमीअर क्रिकेट कौन्सिल (2) इंडियन पोल्युशन कंट्रोल कौन्सिल

(3) इंडो-पाक क्रिकेट कौन्सिल (4) इंटरगव्हर्नमेंट पॅनेल ऑन क्लायमेट चेंज

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudySite.org

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



108. राज्याचे मंत्रिमंडळ, विधानसभा सदस्य आणि विधान परिषद सदस्य हे गट वर्तुळाच्या साहाय्याने कसे दाखवाल?

पर्याय –



(1) (2) (3) (4)

पर्यायी उत्तरे –

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

---

109. लैंगिक परिपक्वता येण्याच्या काळाला __________ म्हणतात.

(1) किशोरावस्था (2) कुमारावस्था (3) तारुण्यावस्था (4) पौगंडावस्था

---

110. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील बालकांच्या (0 ते 6 वर्षे) विकासाकरीता 1975 साली केंद्रसरकारतर्फे __________ ही योजना सुरु करण्यात आली.

(1) एकात्मिक बालविकास सेवा योजना (2) ट्रायसेम

(3) पी एम जी एस वाय (4) पूरक आहार

StudySite.org

---

111. पूर्वशालेय वयातील सामाजिक वर्तनप्रकार म्हणजे __________ होय.

(1) सहकार्य, चढाओढ, सहानुभूती (2) आक्रमकता, नकारात्मकता, भांडणे

(3) अबोल, एकटेपणा, चिडचिड (4) बडबड, दंगामस्ती, मारामारी

---

112. खालील अंक मालिकेला योग्य पर्यायाने पूर्ण करा.

11, 14, 25, 39, 64, **?**

(1) 36 (2) 53 (3) 103 (4) 80

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



113. केंद्र शासनाने अनौपचारिक शिक्षणावर भर देण्यासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना कधी केली?

(1) ऑगस्ट 1981 (2) सप्टेंबर 1985 (3) जानेवारी 1975 (4) नोव्हेंबर 1991





---

114. __________ हा सूक्ष्म अध्यापनाचा प्रणेता आहे.

(1) स्कीनर (2) क्रॉऊडर (3) फ्लॅंडर्स (4) ॲलन

---

115. पुढील संचातील कोणती आकृती विसंगत आहे?

(1)  (2)  (3)  (4) 

---

116. वर्गाध्यापन, विद्यार्थ्यांचे अध्ययन व शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया अशा सर्व वर्तनकृतींचा समूह म्हणजे __________ होय.

(1) प्रशिक्षण (2) मूल्यमापन (3) अनुदर्शन (4) साधन

---

117. समाजपोषण दर्जा सुधारण्यासाठी गर्भवतींना __________ चा पुरवठा करण्यात येतो.

(1) लोहयुक्त गोळ्यां

(2) लोह व फोलिक ॲसीड युक्त गोळ्यां

(3) लोह-फोलिक ॲसीड व जीवनसत्व ब 12 युक्त गोळ्यां

(4) लोह व कॉपरयुक्त गोळ्यां

---

118. शब्द किंवा अंकाच्या साह्याने एकत्रित स्वरूपात एका कोष्टकात माहिती देणे याला __________ म्हणता येईल.

(1) वर्गीकरण (2) पृथक्करण (3) सारणीकरण (4) संस्करण

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

StudySite.org
StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org




**119.** महाराष्ट्र शासनाचा सन 2009 मधला गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ________ यांना मिळाला.





(1) माणिक वर्मा (2) श्रीनिवास खळे

(3) श्रीमती जोत्स्ना भोळे (4) सुमन कल्याणपुर

---

**120.** पुढील आकृती दाखवल्याप्रमाणे छताच्या पृष्ठाला लंब स्थितीत चिकटवली आहे तर तिचे छतातील प्रतिबिंब कोणती आकृती सूचित करते ?




(1)  (2)  (3)  (4) 

---

**121.** विवाह, घटस्फोट, वारसा, पोटगी आदिसंबंधी तरतूदी असणारे 'हिंदु कोड बील' संसदेत मांडूनही ते मंजूर न झाल्यामुळे मंत्रीपदाचा राजीनामा कोणी दिला होता ?

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (2) चिंतामणराव देशमुख

(3) यशवंतराव चव्हाण (4) विश्वनाथ प्रतापसिंग

---

**122.** 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षण देणारे विधेयक संसदेने ________ रोजी संमत केले.

(1) 15 ऑगस्ट 2009 (2) 4 ऑगस्ट 2009 (3) 3 ऑगस्ट 2009 (4) 22 फेब्रुवारी 2010

---

**123.** केंद्र पुरस्कृत ए.बा.वि.से.यो. अंतर्गत बालकांचा कुपोषणाचा दर्जा ________ या वर्गीकरण पद्धतीने ठरविला जातो.

(1) वयानुसार उंची (2) वयानुसार वजन (3) उंचीप्रमाणे वजन (4) बी एम आय

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**124.** DEAR हा शब्द एका सांकेतिक भाषेत WVZI असा लिहीला जातो. तर BELT हा शब्द कसा लिहाल?

(1) YVOG (2) YVOH (3) YUNH (4) YUOH

---

**125.** बालकाच्या वाढ आणि विकासावर __________ या घटकांचा परिणाम होतो.

(1) अनुवंशिकता व वातावरण (2) सामाजिकीकरण

(3) मित्रपरिवार (4) जन्मक्रम

---

**126.** आंतरराष्ट्रीय महिला दिन दरवर्षी 8 मार्च रोजी जगभर साजरा केला जातो. या घटनेस __________ रोजी 100 वर्षे पूर्ण झाली.

(1) 8 मार्च 2000 (2) 8 मार्च 2010

(3) 8 मार्च 2001 (4) अद्याप 100 वर्षे पूर्ण झालेली नाहीत.

---

**127.** अपर्णाला 2 बहिणी व 1 भाऊ आहे. अजयला 3 भाऊ व दोन बहिणी आहेत. रंजना ही अजयची बहीण असून विजय हा अपर्णाचा भाऊ आहे. तर पुढीलपैकी कोणाला सर्वात जास्त बहिणी आहेत?

(1) रंजना (2) अपर्णा (3) विजय (4) अजय

---

**128.** __________ या लॅटीन शब्दावरुन communication हा इंग्रजी भाषेतील शब्द तयार झाला आहे.

(1) commun (2) communis (3) comunis (4) communicate

---

**129.** माहिती संकलनासाठी कोणती आधार सामग्री वापरावी हे __________ वर अवलंबून असते.

(1) उद्दिष्टे, परिकल्पना व व्याप्ती यांवर (2) उद्दिष्टे, गृहितके व चले यांवर

(3) परिकल्पना, गृहितके व ध्येय यांवर (4) उद्दिष्टे, परिकल्पना व चले यांवर

---

**130.** अनु, मधू, काशी व जाई यांची घरे माझ्या घरापासून 5 कि.मी. अंतरावर अनुक्रमे वायव्य, इशान्य, आग्नेय व नैऋत्य दिशांना आहेत. अनूला मधूच्या घरी जायचे असेल तर तिने स्वत:च्या घराच्या कोणत्या दिशेच्या रस्त्याने जायला हवे?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) उत्तर (4) दक्षिण

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org




**131.** 'बुर्ज खलिफा' या जगातील सर्वात उंच इमारतीची उंची ________ इतकी असून तिला ________ आहेत.

(1) 2525 फुट ; 155 मजले (2) 2600 फुट ; 160 मजले

(3) 2625 फुट ; 160 मजले (4) 2650 फुट ; 160 मजले

---

**132.** सोबतच्या आकृतीत किती त्रिकोण आहेत?



(1) 8 (2) 10 (3) 12 (4) 16

---

**133.** गटात न बसणारे पद कोणते?

(1) 15 (2) 14 (3) 24 (4) 63

---

**134.** बालकांच्या हक्कांमध्ये सुधारणा करुन ________ या संघटनेने 1989 साली बालहक्कांचा जाहिरनामा काढला.

(1) युनिसेफ (2) जागतिक शांतता परिषद

(3) संयुक्त राष्ट्रसंघ (4) बाल हक्क परिषद

---

**135.** 'स्व' च्या विकासाची चर्चा करताना "लुकींग ग्लास सेल्फ" चा सिद्धांत कोणी मांडला?

(1) सिगमंड फ्राईड (2) सी.एच. कुले (3) एरिकसन (4) इरावती कर्वे

---

**136.** प्रबोधनामुळे भारतीयांमध्ये ________ जाणीव झाली.

(1) समाजाच्या मागासलेपणामुळे लोक कर्मकांडात गुंतण्याची

(2) समाजाच्या मागासलेपणामुळे लोक शिक्षणाकडे दुर्लक्ष करु लागल्याची.

(3) समाजाच्या मागासलेपणामुळे देशाचे लहान लहान राज्यात विभाजन झाल्याची

(4) समाजाच्या मागासलेपणामुळे देशाचे स्वातंत्र्य नष्ट झाल्याची.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org




**137.** सांख्यिकी माहितीच्या क्षणचित्राला __________ म्हणतात.

(1) छायाचित्र (2) नकाशा (3) रेखाकृति (4) आलेख

---

**138.** पुढील आकृतांचे निरीक्षण करून रिकाम्या जागी योग्य संख्या लिहा.




(1) 59 (2) 45 (3) 51 (4) 49

---

**139.** प्रभावी संप्रेषण ही __________ प्रक्रिया आहे.

(1) एकमार्गी (2) द्विमार्गी (3) वैयक्तिक (4) संकलन

---

**140.** आयोडीन या सूक्ष्मपोषक घटकाची शरीरात कमतरता झाल्यास बालकांमध्ये __________ येते.

(1) शारीरिक अपंगत्व (2) कर्णबधिरत्व (3) मूकत्व (4) मतिमंदत्व

---

**141.** पुढील मालिका पूर्ण करा.

15, 27, 45, 57, 75, **?**

(1) 88 (2) 93 (3) 78 (4) 87

---

**142.** महाराष्ट्र शासनाने अरबी समुद्रात __________ यांचा पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

(1) छत्रपती शिवाजी महाराज (2) संत तुकाराम महाराज

(3) महात्मा फुले (4) शाहू महाराज

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**143.** महिलांच्या तक्रारीचे लवकर निवारण होण्यासाठी व त्यांना न्याय मिळण्यासाठी लोक अदालत प्रमाणेच ''पारिवारिक महिला लोक अदालत'' सुरु करण्याचे कोणी ठरवले ?

(1) राष्ट्रीय महिला आयोग (2) मानव संसाधन विभाग

(3) सामाजिक न्याय मंत्रालय (4) महिला व बाल कल्याण मंत्रालय

---

**144.** 'इस्रो' (ISRO) सन 2012-2013 साली __________ देशासोबत 'चंद्रयान 2' मोहिम सुरु करणार आहे.

(1) अमेरीका (2) जर्मनी (3) रशिया (4) जपान

---

**145.** शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांचे परस्परसंबंध तपासण्यासाठी __________ पद्धतीचा उपयोग केला जातो.

(1) संकलित नोंदपत्रक (2) प्रक्षेपण (3) समाजमिती (4) प्रासंगिक नोंद

---

**146.** अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी __________ आहे.

(1) 2010 - 15 (2) 2002 - 07 (3) 2009 - 14 (4) 2007 - 12

---

**147.** केंद्र सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी मदत म्हणून जाहीर केलेल्या योजनेस __________ म्हणून ओळखतात.

(1) कृषी कर्ज माफी व कर्ज सवलत योजना 2008

(2) कर्ज माफी व कर्ज योजना 2008

(3) कृषी परतफेड योजना 2008

(4) कृषी कर्ज माफी व कर्जपरतफेड योजना 2008-9

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**148.** एक समूह आपण वापरत असलेली संख्याचिन्हे त्याच अर्थाने वापरतो परंतु त्यांच्या गणित प्रक्रिया चिन्हांचे अर्थ वेगळे आहेत. ते असे,

| समूहाचे चिन्ह | $\longrightarrow$ | प्रक्रिया |
|---|---|---|
| $+$ | $\longrightarrow$ | $\div$ |
| $-$ | $\longrightarrow$ | $\times$ |
| $\times$ | $\longrightarrow$ | $+$ |
| $\div$ | $\longrightarrow$ | $-$ |

तर यानुसार,

$64 \div 8 - 12 + 16 \times 2$ या पदावलीची किंमत किती ?

(1) 112 (2) 78 (3) 132 (4) 60

---

**149.** शाळेला आलेल्या अतिकृत्रिमपणाच्या व साचेबंदपणाच्या उद्वेगातून इलिचने ________ ही कल्पना मांडली.

(1) नि:शालाकरण (2) बहुमाध्यम संपुटे (3) निर्मायकता (4) मुक्त शिक्षण

---

**150.** बालमजूरीच्या उच्चाटनासाठी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देणे ही एक महत्वाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर नुकत्याच मंजूर झालेल्या सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार किती वर्षापर्यंत [illegible] मोफत शिक्षण मिळणार आहे ?

(1) 6 ते 14 (2) 0 ते 14 (3) 6 ते 18 (4) 0 ते 18

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org StudySite.org